डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२० – २५६२२६८८/८९
मोबाईल : ९८८१९०८०२०
०२० – २५६२२६९२

संदर्भ : रासेयो/२०२१/२२७ दि. २७/०५/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे, अहमदनगर, नाशिक.

विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित रासेयो एककांच्या उपक्रमांचे अहवाल व माहितीबाबत

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजना ही २०१६ पासुन संपूर्णत: केंद्रशासित योजना झाली असली तरीही राज्य शासनाच्या समन्वयातूनच ती राबविण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत रासेयो मंत्रालय कक्षाची निर्मिती केली असून राज्य संपर्क अधिकारी यांच्या नियंत्रणा खाली रासेयो कक्ष स्वतंत्रपणे कार्यरत आहे. पर्यायाने सर्व विद्यापीठातील रासेयो विभाग हे राष्ट्रीय सेवा योजना कक्ष महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहेत. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित महाविद्यालयांन मधुन राष्ट्रीय सेवा योजनेच्या होणाऱ्या सर्व घडामोडी, उपक्रम अंमलबजावणी आणि प्रशासकीय तसेच सर्व आर्थिक विनिमयासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग जबाबदार आणि उत्तरदायी आहे.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर आपणास सूचित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने मार्फत विद्यापीठामार्फत येणाऱ्या परिपत्रकांचे आणि निर्देशांचेच पालन आणि अंमलबजावणी करणे अनिवार्य तथा क्रमप्राप्त आहे. केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाकडून येणारी परिपत्रके अथवा आदेश–निर्देश विद्यापीठास प्राप्त होतातच आणि त्याबाबत विद्यापीठाकडून आपणास परिपत्रकाद्वारे वेळोवेळी कळविण्यातही येते. अशावेळी ही माहिती अथवा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागासच कळवणे बंधनकारक आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषगांने आपणास सूचित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयाचा रासेयो उपक्रमांचा अहवाल वा अन्य तदानुषंगिक कोणतीही माहिति परपस्पर कोणत्याही राज्य वा केंद्र शासन कार्यालयास वा घटक संस्थेस कळवू नये. प्राचार्य अथवा कार्यक्रम अधिकारी रासेयो यांनी अशी कोणतीही माहिती अथवा अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागासच पाठविणे अनिवार्य आहे.

या नंतरही जर माहिती, अहवाल अथवा मजकुराची परपस्पर देवाणघेवाण झाली तर अशा कोणत्याही माहिती, अहवाल अथवा मजकुराची सत्यता अथवा वैधता याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग जबाबदार असणार नाही आणि अशा कोणत्याही अनिर्देशित उपक्रम/खर्चास मान्यताही मिळणार नाही आणि ही गोष्ट उपयोगिता प्रमाणपत्र व लेखा परीक्षणाच्या वेळी काळजीपूर्वक तपासली जाईल याची नोंद घ्यावी. तरी यापुढे उपरोक्त बाबींचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना